‘अल्कोथॉन २०२६ – नाशिक’ कार्यक्रम यशस्वी

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : मद्य व्यसनुमुक्तीबाबत जनजागृती करण्यासह मद्यमुक्त जीवनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस (ए.ए.) - नाशिक संयुक्त फेलोशिपच्या वतीने आयोजित ‘अल्कोथॉन २०२६ - नाशिक’ कार्यक्रमात सदस्यांसह मद्यव्यसनमुक्तीच्या कार्याशी संबंधित व्यक्तींनी सहभाग घेतला. प्रारंभी डॉ. मुकतेश दौंड तसेच अंबड पोलीस ठाण्याचे निरीक्षक अविनाश नंदावनकिरें यांनी मार्गदर्शन केले. मद्यपानाच्या समस्येकडे एक आजार म्हणून पाहण्याची गरज, योग्य वेळी मदत घेणे, उपचार व उपलब्ध उपाययोजना तसेच कुटुंबीय आणि समाजाचे सहकार्य त्यांनी मांडले. दिवसभर विविध सत्रे घेण्यात आली. मद्यपानाचा आजार, त्यावरील उपाययोजना, मद्यमुक्त जीवनाचा प्रवास, मद्यमुक्तीनंतरचे सहजीवन, आध्यात्मिक प्रगती तसेच मद्यव्यसनमुक्त जीवनातील विविध पैलूंवर चर्चा झाली.

विषबाधाग्रस्त रुग्णांमध्ये सुधारणा

भेळभत्त्यातील चटणीमुळे त्रास

लोकसत्ता वार्ताहर

मालेगाव : तालुक्यातील नांदगाव बुद्रुक येथे आठवडे बाजारात खाल्लेल्या भेळभत्त्याबरोबरच्या दूषित चटणीमुळेच १८६ जणांना विषबाधा झाल्याचे उघड झाले. तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष सर्वेक्षण करून आपला प्राथमिक अहवाल सादर केला असून, त्यामध्ये चटणीच्या सेवनानेच हा त्रास उद्भवल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर, अपर जिल्हाधिकारी हेमांगी पाटील यांनी मंगळवारी मालेगाव येथे भेट देऊन बाधित रुग्णांची विचारपूस केली. ९० टक्के रुग्णांची प्रकृती नियंत्रणात असून त्यांना रुग्णालयातून घरी जाऊ देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

नांदगाव बुद्रुक येथे आठवडे बाजारात पाटणे येथील एका विक्रेत्याने भेळभत्ता आणि तीन प्रकारच्या चटण्या विक्रीसाठी आणल्या होत्या. हे अन्नपदार्थ खाल्ल्यानंतर अनेक ग्रामस्थांना जुलाब, उलटी आणि मळमळीचा




मालेगाव येथील रुग्णालयात अपर जिल्हाधिकारी हेमांगी पाटील यांनी रुग्णांची विचारपूस केली.

तीव्र त्रास सुरू झाला. तालुका आरोग्य अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार, ज्या नागरिकांनी चटणीसह भेळभत्ता खाल्ला त्यांनाच हा त्रास झाला असून, चटणीशिवाय भेळ खाल्लेल्या नागरिकांना कोणताही त्रास झालेला नाही. यावरून भेळभत्त्याबरोबरची चटणी दूषित असल्यामुळेच ही विषबाधा झाल्याचा प्राथमिक निष्कर्ष काढण्यात आला. विषबाधा झालेल्यांमध्ये गुरु सागर कुवर (वय ४) या बालकाची प्रकृती खालावल्याने त्याला तात्काळ अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. इतर सर्व रुग्णांची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रल्हाद गुठे आणि डॉ. ए. ए. मोमीन यांनी सांगितले.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर, मंगळवारी अपर जिल्हाधिकारी हेमांगी पाटील यांनी मालेगाव येथील सामान्य रुग्णालयाला भेट देऊन बाधित रुग्णांची प्रत्यक्ष विचारपूस केली. रुग्णांच्या प्रकृतीची माहिती घेत आरोग्य यंत्रणेला आवश्यक त्या सूचना दिल्या. बाधित नागरिकांना मालेगाव येथील सामान्य रुग्णालय तसेच महिला रुग्णालयात दाखल करून उपचार सुरू करण्यात आले. ही संख्या १२९ असून त्यापैकी सुमारे ९० टक्के रुग्णांची प्रकृती नियंत्रणात आहे. त्यांना रुग्णालयातून सोडण्यास सुरूवात झाली आहे. उर्वरित रुग्णांवर उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीवर वैद्यकीय पथकांकडून लक्ष ठेवण्यात येत असल्याचे पाटील यांनी सांगितले.

शुद्ध अन्नाला प्राधान्य

जिल्ह्यात विविध दुकानांमध्ये तपासणी करणाऱ्या अन्न व औषध प्रशासन विभागाने आता आठवडे बाजारातील खाद्यपदार्थांचीही तपासणी करावी, अपेक्षा मालेगाव तालुक्यातील विषबाधेच्या प्रकारामुळे व्यक्त होऊ लागली आहे. नागरिकांनी शुद्ध अन्नाला प्राधान्य देण्याची गरज आहे.



अंगारकीनिमित्त सजावट....

अंगारकी चतुर्थीनिमित्त गंगापूर रोडजवळील नवश्या गणपती मंदिरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली. (छायाचित्र : यतीश भानू)

ग्रामपंचायतींचा चंदेरी प्रमाणपत्राने गौरव

नाशिक : ग्रामीण भागातील नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे तसेच दूषित पाण्यामुळे होणाऱ्या जलजन्य आजारांच्या साथीला वेळीच प्रतिबंध करता यावा, यासाठी नाशिक जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या पाणी गुणवत्ता सनियंत्रण कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या १०१८ ग्रामपंचायतींचा ‘चंदेरी प्रमाणपत्र’ देऊन गौरव करण्यात आला. सलग पाच वर्षे, सन २०२१ ते २०२५ या कालावधीत सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांची गुणवत्ता कायम राखत जलजन्य आजारांना प्रतिबंध करणाऱ्या ग्रामपंचायतींचा हा सन्मान करण्यात आला.

जिल्हा परिषद सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. यावेळी डॉ. जयंत आडे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात पाच ग्रामपंचायतींना चंदेरी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

१०१८ ग्रा. पं. कडून निकष पूर्ण

जिल्ह्यातील एकूण १,३८७ पैकी १०१८ ग्रामपंचायतींनी चंदेरी प्रमाणपत्रासाठी आवश्यक निकष पूर्ण केले. यामध्ये सलग पाच वर्षे स्वच्छता सर्वेक्षणात हिरवे कार्ड मिळविणे, एप्रिल आणि ऑक्टोबरमध्ये पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे १०० टक्के सर्वेक्षण करणे, जलस्रोतांच्या परिसरात स्वच्छता राखणे, जैविक व रासायनिक पाणी तपासणीमध्ये पाणी पिण्यास योग्य असणे, नियमित क्लोरीनेशन करणे, जलजन्य आजारांच्या साथीवर नियंत्रण ठेवणे आणि लोकप्रतिनिधी, आरोग्य कर्मचारी व जलसुरक्षकांचा सक्रिय सहभाग या प्रमुख निकषांचा समावेश आहे.

तसेच पाणी गुणवत्ता कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीत योगदान देणारे ग्रामपंचायत अधिकारी, आरोग्य कर्मचारी आणि जलसुरक्षक यांना प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) वर्षा फडोळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक दीपक पाटील आदी उपस्थित होते.

सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे वर्षातून दोन वेळा स्वच्छता सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणामध्ये गावातील विहिरी, कूपनलिका, नळ योजना आणि इतर सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांची पाहणी केली गेली. जलस्रोतांच्या परिसरातील स्वच्छता, पाण्याची गुणवत्ता, क्लोरीनेशनची प्रक्रिया तसेच संभाव्य दूषितीकरणाच्या कारणांची तपासणी करत आढळून आलेल्या त्रुटींचे तातडीने निराकरण करून जलजन्य आजारांचा धोका कमी करण्यावर भर दिला गेला.

अण्णासाहेब पाटील महामंडळाकडून २३ हजार लाभार्थींना पाठबळ

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : मराठा समाजातील तरुणांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारे आणि कामगार चळवळीचे खंदे नेते स्वर्गीय आमदार अण्णासाहेब पाटील यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त नाशिक येथील अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ जिल्हा कार्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी स्वर्गीय अण्णासाहेब पाटील यांच्या स्मृतींना उजाळा देत, मराठा तरुणांनी केवळ नोकरी मागणारे न राहता नोकरी देणारे यशस्वी उद्योजक बनावे, असा सूर व्यक्त केला.

या कार्यक्रमास कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त विजय रिसेसर, कौशल्य विकास अधिकारी सागर मोहिते, सिद्धार्थ पवार, अमृत संस्थेचे विभागीय अधिकारी मंगेश खाडीलकर, भाजप युवा मोर्चाचे सागर शेलार तसेच अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या विभागीय समन्वयक पल्लवी मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्ह्यातील महामंडळाचे विविध लाभार्थी आणि मराठा समाजातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविकात विभागीय समन्वयक पल्लवी मोरे यांनी महामंडळाच्या प्रवासावर प्रकाश टाकला. नाशिक जिल्ह्यातील सुमारे २३ हजार लाभार्थींसह राज्यभरातील १.८० लाख तरुणांना स्वयंरोजगाराचे पाठबळ दिल्याचे सांगितले.

सहाय्यक आयुक्त रिसेसर यांनी महामंडळाच्या योजनांचा लाभ घेणाऱ्या तरुणांनी केवळ आर्थिक सहाय्यापुरते मर्यादित न राहता, ज्या महान नेत्याच्या नावाने हे महामंडळ सुरू आहे, त्यांच्या संघर्षाची, विचारांची आणि कार्याची माहिती आवर्जून घेतली पाहिजे. अण्णासाहेबांचे विचार समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज असल्याचे नमूद केले.

परिमंडळात सौर यंत्रणेद्वारे २६० मेगावॅट वीजनिर्मिती

७४ हजार ५५७ ग्राहकांकडून योजनेला प्रतिसाद

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : केंद्र सरकारच्या महत्वाकांक्षी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला महावितरणच्या नाशिक परिमंडळात ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत परिमंडळातील ७४ हजार ५५७ ग्राहकांनी सौर यंत्रणा आपल्या छतावर बसवून पारंपरिक विजेवरील अवलंबित्व कमी करत स्वतःच वीज निर्माते बनून २६० मेगावॅट क्षमतेची वीज निर्मिती सुरू केली आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीसाठी महावितरणतर्फे जनजागृती करण्यात येत असून या योजनेचा ग्राहकांनी अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांनी केले.

महिनाभरात ३०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्न मिळावे, यासाठी केंद्र सरकारने सुरू केलेल्या या योजनेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. महावितरण अहिल्यानगर मंडळात एकूण ३० हजार ४७५ ग्राहक (क्षमता १०२.७७ मेगावॅट), मालेगावात ६ हजार ३५२ ग्राहक (क्षमता २१.७४ मेगावॅट) तर नाशिक मंडळात ३७ हजार ७३० ग्राहक (क्षमता १३५.९६ मेगावॅट) अशा एकूण ७४ हजार ५५७ ग्राहकांची सौर यंत्रणा स्थापित झाली आहे त्यातून एकूण २६० मेगावॅट वीज निर्मितीची क्षमता आहे.

अनुदान किती ?

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत केंद्र सरकारकडून छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविणाऱ्या ग्राहकांना एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला ३० हजार रुपये, दोन किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला ६० हजार रुपये आणि तीन किलोवॅट किंवा त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या प्रकल्पाला ७८ हजार रुपये अनुदान मिळते. हाऊसिंग सोसायट्यांनाही ५०० किलोवॅटपर्यंत प्रती किलोवॅट १८ हजार रुपये अनुदान मिळते. एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पातून सूर्यप्रकाशाच्या उपलब्धतेनुसार महिना अंदाजे १२० युनिट वीज निर्मिती होते. या संदर्भात अधिक माहितीसाठी महावितरणच्या कार्यालयात संपर्क साधावा आणि ग्राहकांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महावितरणने केले आहे.

पोलीस पतसंस्थेचा कर्जावरील व्याजदरात कपातीचा निर्णय

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : नाशिक जिल्हा पोलीस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी मर्यादित, नाशिकची ७७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा प. सा. नाट्यगृह येथे झाली. संस्थेच्या कर्जावरील व्याजदरात कपात करण्यात आली असून, यापुढे कर्ज नऊऐवजी आठ टक्के व्याजदराने देण्यात येणार आहे. यापूर्वी कर्ज घेतलेल्या तसेच यापुढे कर्ज घेणाऱ्या सर्व सभासदांना हा व्याजदर लागू राहणार असून, एक ऑक्टोबरपासून नव्या व्याजदराची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

संचालक मंडळाच्या या निर्णयाचे सभासदांनी स्वागत केले. यंदाच्या वार्षिक सभेत प्रथमच इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सभासदांच्या पाल्यांचा, तसेच पोलीस विभागात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सभासदांचा आणि खेळाडूंचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. सभेस सभासदांसह त्यांच्या कुटुंबियांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती. संस्थेचे अध्यक्ष रुपेश मुळाणे, उपाध्यक्ष अविनाश जुंदरे, संचालक संदीप हांडगे, जालिंदर खराटे, विशाल काठे, गणेश कोंडे, विश्वनाथ काकड, प्रशांत मरकड, कपालेश्वर ढिकले, कडाळे, अश्विनी देवरे आदी उपस्थित होते. सभेत सभासदांच्या हिताच्या अन्य विविध विषयांवरही चर्चा करून निर्णय घेण्यात आले.

बिबट्यासाठी माळेगाव एचपी प्रकल्प परिसरात तीन पिंजरे

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : सिन्नर तालुक्यातील माळेगाव औद्योगिक वसाहतीत हिंदुस्तान पेट्रोलियमच्या (एलपीजी) गॅस प्रकल्प परिसरात वन्यजीवाच्या संभाव्य वावराच्या पार्श्वभूमीवर, वन विभागामार्फत प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि सातत्याने पाहणी करण्यात येत आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने परिसरात तीन पिंजरे बसविण्यात आले असून, सामान्य ड्रोन तसेच थर्मल ड्रोनच्या सहाय्याने दिवसा व रात्री परिसराची पाहणी करण्यात आली.

काही वर्षांत शहरासह ग्रामीण भागात बिबट्यांचा मुक्त संचार वाढल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. जिल्ह्यातील काही निवासी आणि कृषी क्षेत्रांमध्ये बिबट्यांचा वाढता वावर लक्षात घेऊन मध्यंतरी अतिधोकादायक क्षेत्र आणि मध्यम धोकादायक क्षेत्र असे दोन भागात वर्गीकरण करण्याचे नियोजन झाले.

दुसऱ्या दिवशी सिन्नर पोलीस ठाण्याचे निरीक्षक बडगुजर यांच्यासमवेत संपूर्ण परिसराची पुन्हा पाहणी करण्यात आली. मागणीनुसार आणखी एक पिंजरा बसविण्यात आला. तिसऱ्या दिवशी सहाय्यक वनसंरक्षक यांच्या उपस्थितीत दिवसा तसेच रात्री संपूर्ण परिसराची तपासणी करण्यात आली. यासाठी सामान्य ड्रोनसह थर्मल ड्रोनचा वापर करण्यात आला. वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी परिसराची पाहणीही केली.

जनजागृती कार्यक्रम

सिन्नर तालुक्यातील माळेगाव औद्योगिक वसाहतीत एचपीसीएल कंपनीचा गॅस बॉटलिंग प्रकल्प आहे. या परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे लक्षात आल्यावर वन विभागाकडे तक्रार करण्यात आली. या पार्श्वभूमीवर, वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी परिसराची पाहणी करून प्रारंभी दोन पिंजरे बसवले. वन्यजीव-मानव संघर्ष टाळण्यासाठी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

motilal oswal Home Finance

मोतीलाल ओस्वाल होम फायनांस लिमिटेड

नोंदणी कार्यालय : मोतीलाल ओसवाल टॉवर, रहिमतुल्ला सयानी रोड, परेल एस.टी. डेपो समोर, प्रभादेवी, मुंबई – ४०००२५
ग्राहक सेवा : ८२९१८८९८९८ **वेबसाईट :www.motilaloswalhf.com ई–मेल :** hfquery@motilaloswal.com

कब्जा सूचना (स्थावर मिळकत/तींकरिता)

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(१) अन्वये)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकारांनी मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड (पूर्वी ॲस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लि. असे ज्ञात) चे प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४ सन २००२) अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे खालील नमूद तारखेस मागणी सूचना जारी करून पुढील कर्जदारांना सूचनेत नमूद रकमेची परतफेड सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्यास सांगितले होते. रकमेची परतफेड करण्यात पुढील कर्जदारांनी कसूर केली आहे, याद्वारे पुढील कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेला सूचना देण्यात येते की, निम्न स्वाक्षरीकारांनी सदर ॲक्टचे कलम १३ चे उप कलम (४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून वरील वर्णन केलेल्या मिळकतींचा कब्जा येथे खालील नमूद केलेल्या तारखांना घेतला आहे.

अ. क्र.	कर्ज करार क्र./कर्जदार/ सह–कर्जदार/हमीदार यांचे नाव	मागणी सूचनाची तारीख आणि थकबाकी	कब्जा घेतल्याची तारीख	स्थावर मालमत्तेचे वर्णन: मालमत्तेचा पत्ता असलेला सर्व भाग आणि पार्सल
१	LXNAS00316-170031285 कर्जदार: – अनिल झुंबरलाल शर्मा / सह–कर्जदार: – आशा अनिल शर्मा	०६–०७–२०२६ रोजीस रू. ११९१११२/–	२४–०९–२०२६	रो–हाऊस क्र. ७ (क्षेत्रफळ ४५ चौ.मी.; तळमजला २८ चौ.मी. आणि वरचा मजला १२ चौ.मी., एकूण क्षेत्रफळ ४० चौ.मी.); सर्व्हे क्र. ३५५/२अ; प्लॉट क्र. २३ (क्षेत्रफळ १२९.५० चौ.मी.), प्लॉट क्र. २४ (क्षेत्रफळ १३४.७५ चौ.मी.), प्लॉट क्र. २५ (क्षेत्रफळ १३८.२५ चौ.मी.) आणि प्लॉट क्र. २६ (क्षेत्रफळ १४१.७५ चौ.मी.) – एकूण ५४४.२५ चौ.मी. यापैकी प्लॉट क्र. २३ (क्षेत्रफळ १२९.५० चौ.मी.) वर रो–हाऊस बांधलेले आहे; ठिकाण: मनमाड, तालुका नांदगाव, जिल्हा नाशिक. सीमा: पूर्व – पाटील यांची मालमत्ता, पश्चिम – रो–हाऊस क्र. ०६, उत्तर – कॉलनी रस्ता, दक्षिण – मोकळी जागा.
२	LXMONASHIK5224-250738041 / कर्जदार: – संजय दत्तात्रय जाधव / सह–कर्जदार: – वंदना संजय जाधव	०७–०७–२०२६ रोजीस रू. १९८३१०५/–	२४–०९–२०२६	फ्लॅट क्र. अ–३०४ (क्षेत्रफळ ५०.२० चौ.मी., बाल्कनीचे क्षेत्रफळ २.४४ चौ.मी. आणि ओपन टेरेसचे क्षेत्रफळ ९.५९ चौ.मी.). 'नाशिक पोलीस को–ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि.' या योजनेतील 'टाइप ए' इमारतीच्या 'विंग ए' मधील तिसऱ्या मजल्यावर; मौजे आडगाव–२, ता. व जि. नाशिक येथील गट क्र. १०९१/१/२. नाशिक पूर्व – 'बी' इमारतीची मोकळी जागा (मार्जिनल स्पेस); पश्चिम – फ्लॅट क्र. ३०३ आणि लिफ्ट; उत्तर – फ्लॅट क्र. ३०२ आणि जिना; दक्षिण – रस्ता.

विशेषत: कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतींशी व्यवहार करू नये आणि सदर मिळकतींशी कोणताही व्यवहार केल्यास **मोतीलाल ओस्वाल होम फायनान्स लिमिटेड** कडून येथे वरील नमूद करण्यात आलेल्या रकमेसह आणि त्यावर व्याज आकारले जाईल. तारण मत्तांचे विमोचन करण्याकरिता उपलब्ध वेळेनुसार ॲक्टच्या कलम १३ च्या पोट–कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

स्थळ : महाराष्ट्र
दिनांक : ३०.०९.२०२६
भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.
सही/–, अधिकृत अधिकारी (मोतीलाल ओस्वाल होम फायनांस लिमिटेड)

ICICI Bank | **शाखा कार्यालय:** आयसीआयसीआय बँक लिमिटेड, तिसरा मजला, पुष्पा पार्क, क्रोमाच्या वरशोरूम, बोधले नगर, नाशिक–पुणे रोड, महाराष्ट्र– ४२२०११.

जाहीर सूचना – तारण मत्तेच्या विक्रीसाठी निविदा ई– लिलाव

[नियम ८(६) चे तरतुदीकडे पहा]

स्थावर मिळकतीच्या विक्रीकरिता सूचना

वित्तीय मालमत्ततेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम, २००२ अन्वये तसेच सुरक्षा हितसंबंध (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ (६) च्या परंतूकासह स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई–लिलाव विक्री सूचना.
सर्वसामान्य लोक आणि विशेषत: कर्जदार आणि हमीदार यांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता जी सिक्युअर्ड क्रेडीटर यांच्याकडे गहाण/ चार्ज्ड करण्यात आली असुन, त्याचा **प्रत्यक्ष ताबा** आयसीआयसीआय बँक लि.चे अधिकारी यांनी घेतला असून ती ''जसे आहे जिथे आहे'', ''जे आहे ते आहे '' आणि ''तेथे जे असेल ते '' या आधारे होणार आहे, त्याचे तपशील खाली देण्यात आले आहेत.

अ. क्र.	कर्जदाराचे/सह–कर्जदाराचे/ हमीदाराचे नाव/ कर्ज खाते क्रमांक	काही असल्यास ज्ञात बोजासह तारण मत्तेचा तपशील	थकबाकी रक्कम ₹	आरक्षित मूल्य (₹) / इसारा अनामत ठेव ₹	मालमत्तेच्या परीक्षणची तारीख आणि वेळ	ई–लिलाव तारीख आणि वेळ
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)
1.	श्री वैभव मधुकर भालेराव (कर्जदाराचे), श्रीमती सोनाली वैभव भालेराव, श्री मिलिंद मधुकर भालेराव, मेसर्स गोदावरी ट्रांसपोर्ट सर्विसेस (सह–कर्जदाराचे) कर्ज खाते क्रमांक LBNAS00002439417/ LBNAS00002439419	फ्लॅट क्रमांक ७०१, ७०२, ७वा मजला, इमारत क्रमांक टी३, ''ईवा लक्झुरिया'' म्हणून ओळखले जाते, एसआर क्रमांक ३८३/२ वरील बांधकाम, टाकळी रोड नाशिक, नाशिक– ४२२०११. मोजमापित क्षेत्र– कार्पेट एरिया १५३.२८ चौ.मी.	₹ १,३९,५८,१६०/- (सप्टेंबर २३,२०२६ पर्यंत)	₹ ४४,००,०००/- / ₹ ४,४०,०००/-	ऑक्टोबर ०९,२०२६ सकाळी ११:०० दुपारी ०२:०० पर्यंत	ऑक्टोबर २३, २०२६ सकाळी ११:०० पासून

ऑनलाईन लिलाव **(https://BidDeal.in) मेसर्स व्हॅल्यूट्रस्ट कॅपिटल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड** या ई–लिलाव एजन्सीच्या वेबसाईटवर आयोजित करण्यात येईल. तारणदार/नोटीसी यांना **ऑक्टोबर २२, २०२६** रोजी **संध्याकाळी ०५.००** वाजणेपूर्वी एकूण थकबाकी आणि पुढील व्याजासह रक्कम परतफेड करण्याची संधी देण्यात येत आहे. अन्यथा सदर तारण मालमत्तावरील परिशिष्टाप्रमाणे विक्री करण्यात येईल.
संभाव्य बोलीदारांनी बयाणा रक्कम (ईएमडी) **आयसीआयसीआय बँक लिमिटेड, तिसरा मजला, पुष्पा पार्क, क्रोमाच्या वरशोरूम, बोधले नगर, नाशिक–पुणे रोड, महाराष्ट्र– ४२२०११** यांचेकडे डीमांड ड्राफ्ट (डीडी) (कॉलम ई पहा) **ऑक्टोबर २२, २०२६** रोजी **संध्याकाळी ०४.००** वाजणेपूर्वी सादर करावी आणि त्यानंतर त्यांनी त्यांचा प्रस्ताव फक्त वर नमूद वेबसाईटमार्फत **ऑक्टोबर २२, २०२६** रोजी **संध्याकाळी ०५.००** वाजणेपूर्वी ईएमडीच्या पैसे भरल्याच्या पुराव्यासाठी बँक पोचसह – डीडीची स्कॅन केलेल्या ईमेजसह सादर करणे आवश्यक आहे. कृपया नोंद घ्यावी, जर संभाव्य बोलीदारांना वेबसाईटमार्फत त्यांचे प्रस्ताव सादर करणे शक्य नसल्यास, स्वाक्षरीकृत निविदा दस्तावेजाची प्रत **आयसीआयसीआय बँक लिमिटेड, तिसरा मजला, पुष्पा पार्क, क्रोमाच्या वरशोरूम, बोधले नगर, नाशिक–पुणे रोड, महाराष्ट्र– ४२२०११** येथे **ऑक्टोबर २२, २०२६** रोजी **संध्याकाळी ५.००** वाजणेपूर्वी सादर करता येतील. बयाणा रक्कम राष्ट्रीयकृत/वर्गीकृत बँकेकडील डीडी/पीओ **''आयसीआयसीआय बँक लिमिटेड''** यांच्या नावे **नाशिक** येथे देय सादर करावा.
तपासणीसंबंधित, ई–लिलावाच्या शर्ती व अटी किंवा निविदा सादर करण्याशी संबंधित कोणत्याही खुलाशाकरिता कृपया **आयसीआयसीआय बँक लिमिटेडशी ७९७७२७२४८१/९५६१०८७५२२** वर संपर्क करा.
कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व बोली स्विकारणे किंवा नाकारणेचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे राखीव आहे.
विक्रीच्या विस्तृत शर्ती व अटींकरिता कृपया भेटा **www.icicibank.com/n4p4s**

दिनांक : सप्टेंबर ३०, २०२६, ठिकाण : नाशिक — प्राधिकृत अधिकारी, आयसीआयसीआय बँक लिमिटेड

मालमत्तेची ऑनलाइन ई–लिलाव विक्री

फिनिक्स एआरसी लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: वॉलेस टॉवर्स, तिसरा मजला, १३९/१४०/बी/१, शर रोड आणि वेस्टर्न एक्सप्रेस हायवे क्रॉसिंग, विले पार्ले (पूर्व), मुंबई- ४०००५७ | **दूरध्वनी:** ०२२-६८४९२४५० | **फॅक्स:** ०२२-६७४१२३१३,
CIN-U67190MH2007PLC168303|**ईमेल:** info@phoenixarc.co.in |**वेबसाइट:** www.phoenixarc.co.in

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफेसी ॲक्ट) अन्वये असलेल्या अधिकारांचा वापर करून, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ (रूल्स)च्या नियम ८ आणि ९सह वाचन करून, आणि उक्त सरफेसी ॲक्ट व रूल्स अन्वये सुरक्षित कर्जांच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या कर्जदार/ जामीनदार/ गहाण ठेवणाऱ्यांच्या सुरक्षित मालमत्तेचा ताबा अधिकृत अधिकाऱ्याकडे निहित असल्यामुळे, अधिकृत अधिकाऱ्याने सुरक्षित मालमत्ता लिलाव विक्रीद्वारे विकण्याचा निर्णय घेतला आहे.
याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार/ जामीनदार/ गहाणदार यांना सूचना देण्यात येत आहे की, खाली नमूद केलेल्या विविध बँकांनी (हस्तांतरणकर्ता बँका) खाली अधिक तपशीलवार नमूद केलेल्या संबंधित हस्तांतरण करारांनुसार फिनिक्सच्या नावे कर्जाचे हस्तांतरण केल्यामुळे, Phoenix Trust-FY26-13 (फिनिक्स)चे विश्वस्त म्हणून कार्यरत असलेल्या फिनिक्स एआरसी लिमिटेड (पूर्वीचे नाव फिनिक्स एआरसी प्रायव्हेट लिमिटेड)कडे गहाण ठेवलेल्या खाली नमूद मालमत्ता, थकबाकी आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इत्यादींच्या वसुलीसाठी **"जशी आहे तशी, जिथे आहे तिथे, जे काही आहे ते आणि कोणत्याही दाव्याशिवाय" या अटीवर,** "ऑनलाइन ई-लिलावाद्वारे" विकल्या जातील. **हा लिलाव सरफेसी कायद्याच्या तरतुदीनुसार आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, २००२च्या नियम ८ आणि ९ नुसार, खाली दिलेल्या तपशिलानुसार https://www.bankeauctions.com** या वेबसाइटद्वारे केला जाईल.

कर्जदाराचे नाव	**कृषी तंत्र निकेतन– त्यांच्या अधिकृत स्वाक्षरीकर्त्याद्वारे प्रतिनिधित्व** सौदाणे पोस्ट, देवळा तालुका, नाशिक, महाराष्ट्र– ४२३२०८
सह–कर्जदार/ जामीनदार/ गहाणदार/ भागीदारांची नावे	**१. श्री गजानन महाराज माध्यमिक शाळा– त्यांच्या अधिकृत स्वाक्षरीकर्त्याद्वारे प्रतिनिधित्व,** सौदाणे पोस्ट, देवळा तालुका, नाशिक, महाराष्ट्र– ४२३२०८ **२. श्री स्वामी समर्थ कृषी तंत्र निकेतन– त्यांच्या अधिकृत स्वाक्षरीकर्त्याद्वारे प्रतिनिधीत्व.** सौदाणे पोस्ट, देवळा तालुका, नाशिक, महाराष्ट्र– ४२३२०८. **३. कै. नगिनथाई हिरा चाजेओ प्राथमिक शाळा– अधिकृत स्वाक्षरीकर्त्याद्वारे प्रतिनिधित्व.** सौदाणे पोस्ट, देवळा तालुका, नाशिक, महाराष्ट्र–४२३२०८ **४. कै. ठगुबाई शंकर देवरे सेवाभावी संस्था– तिच्या अधिकृत स्वाक्षरीकर्त्याद्वारे प्रतिनिधित्व.** सौदाणे पोस्ट, देवळा तालुका, नाशिक, महाराष्ट्र– ४२३२०८ **५. लक्ष्मण शंकर देवरे - शंकर यांचा मुलगा,** गॅट क्र. ७१, प्लॉट क्र १०, अहिरे नगर जवळ, श्री महालक्ष्मी निवास, कलेक्टर पट्टा, मालेगाव तालुका, जिल्हा– नाशिक– ४२३२०३ ६. रंजना लक्ष्मण देवरे– लक्ष्मण यांची पत्नी गट क्र. ७१, प्लॉट क्र. १०, अहिरे नगर जवळ, श्री महालक्ष्मी निवास, कलेक्टर पट्टा, मालेगाव तालुका, जिल्हा– नाशिक– ४२३२०३
असाइनमेंटचा तपशील	हस्तांतरणकर्ता– **एडलवाईस असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड (EARC trust-Sc-467 ची विश्वस्त या नात्याने कार्यरत)** हस्तांतरणाची तारीख– २९/१२/२०२५

सरफेसी नोटीसनुसार देय रक्कम, दिनांक १७/०६/२०२१ रोजी रु. **४७,१८,७३७/- (फक्त सत्तेचाळीस लाख अठरा हजार सातशे सदतीस रुपये),** दिनांक २१/०६/२०२१च्या मागणी नोटीसमध्ये नमूद केल्यानुसार पुढील व्याज आणि इतर खर्च, शुल्क आणि खर्चासह.

स्थावर मालमत्तेचे वर्णन: गट क्र. १०० (पी) अंतर्गत येणारी संपूर्ण जागा, मोजमाप क्षेत्र २ हेक्टर (२००८० चौ. मी.), गिगाव, सौंदाणेगाव, मौजे गिगाव, तालुका मालेगाव, जि. नाशिक, महाराष्ट्र– ४२३५०२. **सीमा: उत्तर:** सखाराम पवार मिळकत, **दक्षिण:** भरत गोकुळ मिळकत, **पूर्व:** पंडित पुंडलिक मिळकत, **पश्चिम:** गावठाण रोड

ताब्याचा तपशील	हस्तांतरकाने सरफेसी कायदा, २००२च्या तरतुदींनुसार दिनांक ०७/०७/२०२३ रोजी उपरोक्त मालमत्तेचा ताबा घेतला आहे.
मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ	विनंतीनुसार
राखीव किंमत	**रु. ७०,७२,०००/-** (फक्त सत्तर लाख बहात्तर हजार रुपये)
बयाणा रक्कम ठेव	**रु. ७,०७,२००/-** (फक्त सात लाख सात हजार दोनशे रुपये)
ईएमडी भरणा तपशील: बँक खाते- "Phoenix Trust-FY26-13" खाते क्रमांक: ९०४९९१९८०९; कोटक महिंद्रा बँक लिमिटेड, शाखा: कलिना, मुंबई, आयएफएससी कोड: KKBK0000631	
वाढीव मूल्य	**रु. २५,०००/-** (फक्त पंचवीस हजार रुपये) आणि अशा पटीत
ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख	०२/११/२०२६ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी.
ई-लिलावाची तारीख आणि वेळ	०३/११/२०२६ (मंगळवार) सकाळी ११:०० ते दुपारी ०१:००
मालमत्तेच्या निविदा दस्तऐवजांसाठी लिंक: https://phoenixarc.co.in?p=7648	

ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती

१. सरफेसी कायद्याच्या तरतुदींनुसार अधिकृत अधिकाऱ्यामार्फत ई-लिलावाच्या साहाय्याने लिलाव विक्री आयोजित केली जात आहे. लिलाव/ बोली केवळ **https://www.bankeauctions.com** या वेबसाइटद्वारे "ऑनलाइन इलेक्ट्रॉनिक पद्धतीने" होईल. मे. सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड हे ई-लिलावासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणारे सेवा प्रदाता आहेत.
२. लिलाव हा बोली दस्तऐवजातील अटी व शर्तीनुसार आणि त्यात नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार आयोजित केला जातो. विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तीसाठी, बोलीदारांनी बोली दस्तऐवज, लिलावासाठी ठेवलेल्या तारण मालमत्तेचा तपशील/ बोली अर्ज मिळवण्यासाठी फिनिक्सची वेबसाइट, **www.phoenixarc.co.in** आणि वर नमूद केलेल्या लिंक्स, तसेच सेवा प्रदात्याची वेबसाइट, **www.bankeauctions.com** पहावी.
३. बोलीदार आपापल्या कार्यालयातून/ आपल्या पसंतीच्या ठिकाणाहून दरपत्रक सादर करून/ बोली लावून ई-लिलावात सहभागी होऊ शकतात. इंटरनेट जोडणीची व्यवस्था प्रत्येक बोलीदाराला स्वतःच करावी लागेल. इंटरनेट जोडणी, नेटवर्कमधील समस्या, सिस्टीम क्रॅश होणे, वीजपुरवठा खंडित होणे इत्यादींसाठी प्राधिकृत अधिकारी/ फिनिक्स/ सेवा प्रदाता जबाबदार राहणार नाहीत.
४. ई-लिलावासंबंधी तपशील, मदत, कार्यपद्धती आणि ऑनलाइन प्रशिक्षणासाठी, इच्छुक बोलीदार **मे. सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे श्री. भाविक पंड्या यांच्याशी संपर्क साधू शकतात, संपर्क क्रमांक:** +९१-१२४-४३०२०२०/ २०२१/ २०२२/ २०२३/ २०२४, +९१-८८६६६८२९३७ **ईमेल आयडी: support@bankeauctions.com; maharashtra@c1india.com**
५. बोली लावणाऱ्यांनी लिलावासाठी ठेवलेल्या सुरक्षित मालमत्तेचा तपशील पडताळण्यासाठी/ बोली अर्ज मिळवण्यासाठी फिनिक्सच्या **www.phoenixarc.co.in** या वेबसाइटला भेट द्यावी.
६. वर नमूद केलेल्या तारखेला आणि वेळेला ई-लिलाव आयोजित केला जाईल, ज्यामध्ये वर नमूद केलेली तारण ठेवलेली मालमत्ता **"जशी आहे तशी" आणि "जे काही आहे तशी" व "कोणत्याही दाव्याशिवाय"** या अटीवर विकली जाईल.
७. सर्व इच्छुक खरेदीदार/ बोली लावणाऱ्यांनी, वर नमूद केलेल्या तारखेला आणि वेळेला ई-लिलावात सहभागी होण्यासाठी, **https://www.bankeauctions.com** या वर नमूद केलेल्या पोर्टलवर आपल्या नावाची नोंदणी करणे आणि विनामूल्य युझर आयडी व पासवर्ड मिळवणे आवश्यक आहे.
८. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/ बोली लावणाऱ्यांना, सुरक्षित मालमत्तेच्या राखीव किमतीच्या १०% परत करण्यायोग्य बयाणा रक्कम भरल्याचा तपशील, निविदा दस्तऐवजात अधिक तपशीलवार वर्णन केल्यानुसार पॅनकार्डच्या, कंपनीच्या बाबतीत संचालक मंडळाच्या ठरावांच्या आणि पत्त्याच्या पुराव्याच्या प्रतींसह, वर नमूद केलेल्या बयाणा रक्कम जमा करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत किंवा त्यापूर्वी सादर करावा लागेल. इच्छुक खरेदीदार/ बोली लावणाऱ्यांना येथे वर तपशीलवार वर्णन केलेल्या मालमत्तेसाठी बयाणा रक्कम जमा करणे आवश्यक आहे.
९. संभाव्य/ इच्छुक बोलीदाराने असे हमीपत्र सादर करावे की तो/ ती/ ते दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६च्या कलम २९(अ)च्या तरतुदींनुसार अपात्र नाही आणि केवायसी कागदपत्रांसोबत असे हमीपत्र सादर करण्यात अयशस्वी झाल्यास, तो/ ती/ ते आपोआप अपात्र ठरेल किंवा त्याची/ तिची/ त्यांची बोली नाकारली जाईल.
१०. यशस्वी खरेदीदार/ बोली लावणाऱ्याने प्रत्येक वस्तूसाठी आपल्या बोलीच्या २५% (अनामत रकमेसह) रक्कम, वर नमूद केलेल्या लिलावाच्या तारखेला बँकिंग कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी किंवा पुढील कामकाजाच्या दिवसापर्यंत, वर नमूद केलेल्या खात्यात आरटीजीएस/ एनईएफटीद्वारे जमा करावी. या ठेवीची फिनिक्सकडून पुष्टी होणे आवश्यक आहे, अन्यथा विक्री अयशस्वी मानली जाईल आणि उक्त यशस्वी खरेदीदार/ बोली लावणाऱ्याची अनामत रक्कम जप्त केली जाईल.
११. ई-लिलावात यशस्वी न झालेल्या इतर सर्व बोलीदारांची अनामत रक्कम, ई-लिलाव समाप्त झाल्यापासून ५ कामकाजाच्या दिवसांच्या आत फिनिक्सद्वारे परत केली जाईल. अनामत रकमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
१२. खरेदीची निश्चित केलेली उर्वरित रक्कम यशस्वी खरेदीदार/ बोली लावणाऱ्याने, सदर तारण मालमत्तेच्या विक्रीची पुष्टी झाल्याच्या पंधराव्या (१५) दिवसापर्यंत किंवा लेखी स्वरूपात मान्य केलेल्या अशा वाढीव कालावधीपर्यंत देय असेल. चूक झाल्यास, तोपर्यंत जमा केलेली सर्व रक्कम जप्त केली जाईल.
१३. मालमत्तेची पाहणी करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी, इच्छुक बोलीदारांनी **सुश्री. सानिका वाडकर/ श्री. शैलेश अय्यंगार यांच्याशी खालील ईमेल पत्त्यावर sanika.wadkar@phoenixarc.co.in/ sailesh.iyenger@phoenixarc.com/ (ईमेल) किंवा** +९१-०८६५५३५५८१४/ +९१-९८३३८०११५९ **(मोबाइल) वर संपर्क साधावा.**
१४. लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता ई-लिलाव/ बोली/ प्रस्ताव स्वीकारू/ नाकारू/ सुधारित करू/ रद्द करू शकतात किंवा लिलाव पुढे ढकलू शकतात.
१५. यशस्वी खरेदीदार/ बोली लावणाऱ्याने, लागू कायद्यानुसार मालमत्तेचे हस्तांतरण/ सुपूर्दगी मिळवण्यासाठी आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक शुल्क, कर, देय फी, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इत्यादी सोसावे लागतील.
१६. मालमत्तेवर कोणत्याही वेळी देय असलेली सर्व वैधानिक/ अवैधानिक देणी, कर, दर, मूल्यांकन, शुल्क, सोसायटीची देणी, फी इत्यादी भरण्याची संपूर्ण जबाबदारी केवळ यशस्वी बोली लावणाऱ्याचीच असेल.
१७. यशस्वी खरेदीदार/ बोली लावणारा हा त्याच्या/ तिच्या नावे हक्कांचे हस्तांतरण करण्यासाठी सोसायटी/ इतर कोणत्याही प्राधिकरणास देय असलेल्या कोणत्याही खर्च/ शुल्क/ आकार इत्यादींसाठी पूर्णपणे जबाबदार असेल.
१८. उक्त थकबाकीसाठी जबाबदार असलेले कर्जदार/ गहाण ठेवणारे, यांनी ही विक्री सूचना, सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियमांच्या नियम ८ आणि ९ अन्वये, उपरोक्त नमूद केलेल्या लिलाव विक्रीच्या आयोजनाविषयीची सूचना मानावी.
१९. इच्छुक बोलीदारांनी आपली बोली सादर करण्यापूर्वी, लिलावासाठी ठेवलेल्या तारण मालमत्तेवरील बोजा, मालकी हक्क आणि तारण मालमत्तेवर परिणाम करणारे दावे/ हक्क/ देयके, ज्यात वैधानिक देयकांचा समावेश आहे, इत्यादींबाबत स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी. लिलावाची जाहिरात ही फिनिक्सकडून कोणतेही वचन किंवा प्रतिनिधित्व दर्शवत नाही आणि दर्शवणार नाही. फिनिक्सचा अधिकृत अधिकारी कोणत्याही तृतीय-पक्षाच्या दाव्यांसाठी/ हक्कांसाठी/ देयकांसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.
२०. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या ई-लिलावाच्या सूचनेत नमूद केलेला तपशील अधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम माहितीनुसार सांगण्यात आला आहे; तथापि, कोणत्याही त्रुटी, चुकीच्या विधानासाठी किंवा वगळण्यासाठी अधिकृत अधिकारी जबाबदार राहणार नाही.
२१. जर वर नमूद केलेला ई-लिलाव कोणत्याही कारणास्तव अयशस्वी झाला, तर फिनिक्सला सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, २००२च्या नियम ८(५) आणि सरफेसी कायदा, २००२च्या तरतुदींनुसार तारण ठेवलेली मालमत्ता इतर कोणत्याही पद्धतीने विकण्याचा अधिकार आहे.

ठिकाण : नाशिक
दिनांक: ३०/०९/२०२६
सही/- अधिकृत अधिकारी, फिनिक्स एआरसी लिमिटेड (Phoenix Trust-FY26-13चे विश्वस्त)